महाराष्ट्र पोलीस दलातील बिनतारी संदेश विभाग, मोटार परिवहन विभाग, नौका विभागातील पदांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,

गृह विभाग,

शासन निर्णय, क्रमांक-पीएए०१९५/सीआर-५४५/पोल-५अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक- ८ एप्रिल, १९९९

वाचा:- १] शासन निर्णय, गृह विभाग, क्र. पीएए०१९५/सीआर-५४५/पोल-५अ, दि. २१ ऑगस्ट, १९९८

२] शासन शुध्दिपत्रक क्रमांक-पीएए०१९५/सीआर-५४५/पोल-५अ, दि. १०. ९. १९९८

३] पोलीस उप महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. आस्था-१/९६८०-८१/९८, दि. २७ ऑगस्ट, १९९८ चे पत्र.

शासन निर्णय :- शासन निर्णय, गृह विभाग, क्र. पीएए०१९५/सीआर-५४५/पोल-५अ, दि. २१. ८. १९९८ व शासन शुध्दिपत्रक क्र. पीएए०१९५/सीआर-५४५/पोल-५अ, दि. १०. ९. ९८ अन्वये पोलीस दलातील बिनतारी संदेश विभाग, मोटार परिवहन विभाग व नौका विभागातील कर्मचा-यांना पोलीस दलातील कर्मचा-यांप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी दि. १. १. १९८६ पासून मंजूर करण्यात आली आहे. तथापि मोटार परिवहन विभागातील प्रमुख हवालदार चालक, यांत्रिकी वर्ग-१ हे पद व नौका विभागातील लाँच इंजिन चालक व डिंगी चालक ही पदे महाराष्ट्र पोलीस दलातील कोणत्या पदांशी समकक्ष आहेत. याबाबत योग्य तो खुलासा प्राप्त न झाल्यामुळे ही पदे उपरोक्त शासन निर्णयामधून वगळण्यात आली होती. आता याबाबत प्राप्त झालेला खुलासा विचारात घेवून त्या पदांनाही खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी दि. १ जानेवारी, १९८६ पासून व शासन निर्णय सम क्रमांक दि. २१. ८. १९९८ मध्ये दिलेले निदेश व अटींच्या अधिन राहून निश्चित करण्यास शासन मंजूरी देत आहे.

अ.क्र. १.	पदाचे नांव सध्याची वेतनश्रेणी २.	सुधारित वेतनश्रेणी ३.
१]	प्रमुख हवालदार चालक यांत्रिकी वर्ग-१	
	रु. १३२०-३०-१५६०-दरो-४०-२०४०	रु. १४००-४०-१८००-दरो-५०-२३००
२]	मोटार लाँच चालक	
	रु. ९७५-२५-११५०-दरो-३०-१६६०	रु. १४००-४०-१८००-दरो-५०-२३००
३]	डिंगी चालक	
	रु. ९५०-२०-११५०-दरो-२५-१४००	रु. १३२०-३०-१५६०-दरो-४०-२०४०

२. या वेतन सुधारणेमुळे होणारा खर्च "२०५५-पोलीस" या मुख्यलेखाशिर्षाखालील संबंधित गौण शिर्षाखाली/उप शिर्षाखाली "वेतन" या [illegible] उद्दिष्टाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो चालू वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने आणि त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १८५-सेवा-१०, दिनांक ३१.३.१९९९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[ना. गो. काकड]
सह सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

....

प्रति,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महासंचालक, लाचलुचपत विरोधी विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य व विशेष पोलीस महानिरीक्षक, पुणे,
आयुक्त व विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हा अन्वेषण विभाग [गुप्तवार्ता], महाराष्ट्र राज्य, मुंबई,
अपर पोलीस महासंचालक, गुन्हा अन्वेषण विभाग [गुन्हे], महाराष्ट्र राज्य, पुणे,
विशेष पोलीस महानिरीक्षक [प्रशिक्षण व खास पथके], मुंबई,
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक,
सर्व परिक्षेत्र विशेष पोलीस महानिरीक्षक/उप महानिरीक्षक,
पोलीस उप महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व पोलीस अधिक्षक,
पोलीस उपआयुक्त, मोटार परिवहन विभाग, मुंबई,
सर्व प्राचार्य, प्रादेशिक पोलीस प्रशिक्षण शाळा,
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १३,
प्रधान महालेखापाल-१ [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र मुंबई,
महालेखापाल [२], महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व कोषागार अधिकारी,
वित्त विभाग [व्यय-७], [illegible] [अर्थसंकल्प-३][अर्थसंकल्प-१०],
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.